**<u>नियमित फौजदारी खटला क्रं. १५६/२०२१</u>**
**<u>शासन वि. सुकु उर्फ शिवकुमार</u>**
**<u>नि.क्र.४२ .</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रं. १</u>**

**नांव – उषा राजकुमार कारभारी,**

**वय – ५१ वर्षे, कामधंदा – घरकाम व शेत काम**

**रा. – लोहारा, ता. उदगीर**

**<u>साक्षीदार यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–</u>**

दि २४/०२/२०२१ रोजी केस मधील घटना घडली होती. ती लोहारा येथे माझ्या घरा समोर घडली. सर्व्हे क्र. ४३० महादेवाच्या मंदीराजवळ त्या ठिकाणी माझी व माझा भाया संजय डिगांबर कारभारी यांची चार एकर जमीन आहे. त्या जमीनमध्ये एक वाडा आहे. संयज कारभारी यांनी तो वाडा शिवकुमार शिवराज सोनटक्के यांना विकला. त्यामुळे दि.२४/०२/२०२१ रोजी आम्हाला मारायला आले. ते पाईप घेवून आले होते त्यांनी तेथून निघून जावे म्हणून धमकी दिली. त्यांनी आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली. शिवकुमार शिवराज सोनकटक्के यांनी माझ्या उजव्या हातावर पाईप मारले. त्यावेळी त्यांची आई पण आली होती. मला हातावर पाईप लागल्यामुळे उजवा हात बेंड झाला व माझ्या तोंडाला व पायाला जखम होवून रक्त येवून लागले. त्यांच्या आई ने माझ्या उजव्या हाताला चावले तेथून रक्त येवू लागले. त्यावेळी माझा भाया संजय डिगांबर कारभारी आला. त्यांनी माझा मुलगा गणेश यांना शिवीगाळ केली व गणेश कारभारीला लाथाबुक्यांनी मारले व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांनी

जानकाबाई विश्वाबंर धनबा ही आणि संजय धनूर आले. त्यांनी आम्हाला सोडावले. मी पोलिस स्टेशनला येवून तक्रार केली. मला आता माझी फिर्याद वाचून दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांवर माझी सही आहे. त्याला **निशाण ४३** देण्यात आला. मला आरोपी यांनी लोखंडी पाईपने मारले तो पाईप मला दाखविला तर मी ओळखू शकते. मला GMR क्र २२/२०२५ दि. ३०/०६/२०२५ मध्ये लोखंडी पाईप दाखविला तो पाईप तोच होय. कोर्टात समोर उपस्थित असलेले तिन्ही आरोपी ते तेच आहेत.

**साक्षीदार क्र. १ चा उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे श्री. पी.एस. बिरादार विधीज्ञ सुरु**

संजय कारभारी हा नात्याने माझा भाया आहे. राजू कारभारी हा संजय कारभारी यांचा भाउ आहे. त्या दोघाच्या वडीलाचे नाव डिगांबर गणपतराव कारभारी असे होते. डिगांबर यांना दोन बायका होत्या. डिगांबर यांना दोन मुले व सहा मुली होत्या. माझ्या कडे आलेली चाळीस एकर जमीन ही वाटणी होवून आली आहे. ती वाटणी कोर्टामधून झालेली होती. वाटणी डिगांबर यांच्या पश्चात कोर्टामार्फत झालेली होती. सर्व्हे क्र. ४३० चा जूना सर्व्हे नंबर मला सांगता येत नाही. गट क्र. ४३० मध्ये चार एकर क्षेत्र आमचे आहे. त्यांचा सातबारा माझ्याकडे आहे. गट क्र. ४३० ची जमीन माझ्यात व माझ्या भायात सामाईक आहे. त्या जमीन मध्ये आमच्या दरम्यान वाटण्या झालेल्या नाहीत. त्या जमीनीतील वाडयाला गिरणीचा वाडा म्हणून ओळखला जातो. हे म्हणणे खरे नाही की, गिरणीचा वाडा हा

संजय यांच्या वाटणी आलेली मिळकत होय. डोरमल मारवाडी हवेली माझ्या हिश्यात आलेली आहे. त्या हवेलीचे खरेदीपत्र हे संजय व राजू यांच्या नावे १९८२ साली डिगांबर यांच्या हयातीत झालेले आहे. त्या हवेली मधील निम्मा हिस्सा संजय यांचा होता व त्यांनी तो राजू दिला होता की का ती गोष्ट माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३० मधील गिरणीचा वाडा हा संजय याच्या हिश्याला गेला त्यात माझा कोणता हक्क नाही. महसूल दप्तरी ८–अ उताराला फक्त संजय कारभारी यांच्या नावाची नोंद आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या घराचे मालक व कब्जेदार संजय कारभारी फक्त आहेत. आरोपी क्र. १ यांने गिरणीचा वाडा या जागेचे खरेदीपत्र स्वतःची बहिण शिवनंदा गंधगे यांच्या नावाने नोंदविले होती का मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवनंदा गंधगे या उदगीर येथे वास्तव्यास असल्याने मी व माझ्या मुलाने गिरणीच्या घराचे दार व लोखंडी अॅंगल काढून नेले. हे म्हणणे खरे नाही की, भागीरथीबाई आम्हाला म्हणाली की आम्ही पत्रे, नाटी व अॅगल का घेवून गेलेले होते तेव्हा आम्ही त्यांच्याशी भांडणे व वाद केला. आरोपी क्र. १ सुकूकुमार यांची आमच्या चोरीची तक्रार देण्याविषयी आम्हाला सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि २४/०२/२०२१ रोजी कोणतीही घटना घडली नसताना आमच्या विरुध्द तक्रार करुन नये म्हणून तक्रार दाखल केली आहे.

हे म्हणणे खरे नाही की , आरोपी ने तोंडावर, हातावर, पायावर माझ्या मुलाला कोठेही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की,

भागीरथी बाई यांनी माझ्या हाता बोटाला कोठेही चावा घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवकुमार संजय कारभारी यांनी आम्हाला कोणतीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाणकाबाई व संजय धणूले यांनी भांडण सोडवले हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही माराहाण झाली नसता खोटे वैदयकीय प्रमाणपत्र मिळवले. हे म्हणणे खरे नाही की, गिरणीचा वाडा या गट क्र. ४३० मधील मिळकती मध्ये आमचा कोणताही हक्क नाही. ग्राम पंचायतीमध्ये गिरणीच्या वाडयाला शिवनंदा गणगे यांच्या नावची नोंद झाली आहे का काय हे मला माहिती नाही. गट क्र. ४३० शिवनंदा गणगे यांना विक्री केलेली जागा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, संजय कारभारी यांच्या विरुध्द फौजदारी खटले दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतापास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.07.02 15:14:39 +0530

दिनांक – ०१/०७/२०२५

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर.